## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल

## अपिल क्रमांक : के.आर-३२५१/२०२२

**अपिलार्थी, श्री.वंदना संतोष शिंदे,**
**शिंदे निवास, राऊत चाळ समोर,**
**वाणी आळी, कुळगांव, बदलापूर (पूर्व),**
**जि.ठाणे ४२१ ५०३.**

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी,
अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती,
कोकण विभाग, ठाणे, एमटीएनल इमारत,
६वा मजला, गणेश टॉकीज जवळ, चरई,
ठाणे (प), जि.ठाणे ४०० ६०१.

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा वरीष्ठ संशोधन अधिकारी,
अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती,
कोकण विभाग, ठाणे, एमटीएनल इमारत,
६वा मजला, गणेश टॉकीज जवळ, चरई,
ठाणे (प), जि.ठाणे ४०० ६०१.

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक** : ५.३.२०२६

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| ४.७.२०२२ | ३०.८.२०२२ | १०.८.२०२२ | ---- |

अपिलार्थी यांनी दि.१४.११.२०२२ रोजीच्या अर्जान्वये "जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविली नाही." असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिल अर्जात त्यांनी कोणतीही विनंती केलेली नाही.

सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक ५.३.२०२६ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.आकाश दिलीप शिंदे, संशोधन अधिकारी, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, कोकण विभाग, ठाणे हे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

*"(जात पडताळणी प्रमाणपत्राची संपूर्ण संचिका साक्षांकित करुन मिळणेबाबत.) "*

*"(श्री. संजय नाना शिंदे यांचे जात पडताळणी प्रमाणपत्र क्र. TCSC -१३०२४९/११ Dec २००७, प्रकरण क्र. DD/TCSC /SER/Thane संपूर्ण संचिका साक्षांकित करून मिळावी.)"*

तद्नंतर अपिलार्थी यांनी जोडपत्र ब मध्ये "माहिती प्राप्त झालेली नाही." असे कारण नमूद करुन प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये प्रथम अपिल दाखल केले.

अपिलार्थींनी दाखल केलेल्या प्रथम अपिलावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.१६.९.२०२२ रोजी सुनावणी घेऊन, "जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान केलेल्या खुलाशाच्या अनुषंगाने त्यांनी अर्जदार यांना दि.२२.८.२०२२ चे पत्रान्वये दिलेले उत्तर योग्य व वस्तुस्थितीदर्शक आहे. सबब, अपिलार्थी यांचा अपिल अर्ज निकाली काढण्यात येत आहे." असा निर्णय दिलेला आहे.

या प्रकरणी अपिलार्थी यांनी असे निवेदन केले की, त्यांना अद्याप माहिती प्राप्त झालेली नाही. त्यांनी असा आक्षेप घेतला की, जन माहिती अधिकारी यांना दि.१०.८.२०२२ रोजीच्या पत्रानुसार, श्री. संजय नाना शिंदे यांनी दि.२२.८.२०२२ रोजी (मृत पावलेल्या व्यक्तीने) दि.१०.८.२०२२ रोजी माहिती देऊ नये असे कळविण्याबाबत पत्र दिले आहे व दिशाभूल करणारे उत्तर दिले आहे. माहिती देण्याबाबत टाळाटाळ केली आहे याचा पुरावा म्हणून त्यांनी श्री.संजय नाना शिंदे यांचा दि.१८.८.२०१८ रोजीचा मृत्यू दाखला आयोगास सुनावणी दरम्यान सादर केलेला आहे.

अपिलार्थी यांचे असे म्हणणे आहे की, श्री. संजय नाना शिंदे हे त्यांचे चुलत दिर होते. त्यांनी जात पडताळणी समितीकडून त्यांच्या कुटुंबाचे जात प्रमाणपत्र प्रमाणित करून जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त करून घेतले आहे. हे जात वैधता

प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठी त्यांनी जी कागदपत्रे सादर केली आहेत त्या कागदपत्रांच्या आधाराने आपण आपल्या मुलीचे जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त करून घेऊ शकतो. त्यासाठी आपणास ही माहिती आवश्यक आहे.

त्यांनी पुढे असाही युक्तिवाद केला की, जन माहिती अधिकारी यांचेकडे श्री. संजय नाना शिंदे यांचेकरिता म्हणून अज्ञात व्यक्तीने माहिती उघड करण्यासाठी आक्षेप नोंदविला आहे. आपण दि.४.७.२०२२ रोजीच्या अर्जाद्वारे ज्या माहितीची मागणी केली होती अशी माहिती उघड करण्यासाठी श्री. संजय नाना शिंदे यांच्यावतीने अज्ञात व्यक्तीने दि.१०.८.२०२२ रोजीच्या पत्रान्वये आक्षेप घेतला आहे. मात्र, यापूर्वीच श्री. संजय नाना शिंदे यांचा दि.१८.८.२०१८ रोजी मृत्यू झाला असल्याबाबतचे मृत्यू प्रमाणपत्र त्यांनी सादर केले आहे. त्यामुळे श्री. संजय नाना शिंदे यांच्या वतीने कोणी आक्षेप घेतला हे स्पष्ट नसताना जन माहिती अधिकारी यांनी तो आक्षेप ग्राहय मानून त्यानुसार माहिती पुरविण्यास नकार दिलेला आहे.

अपिलार्थी यांचा युक्तिवाद बघता सदरची माहिती उघड करण्यास ज्या व्यक्तीतर्फे आक्षेप घेण्यात आलेला आहे ती व्यक्ती मृत पावली असल्याने त्यांनी आक्षेप घेण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. हे जरी खरे असले तरी ज्यांच्याबद्दल माहिती मागण्यात आली आहे असे श्री. संजय नाना शिंदे यांची ही वैयक्तिक माहिती आहे हे स्पष्ट आहे. अपिलार्थी यांचे असे म्हणणे आहे की, श्री. संजय नाना शिंदे हे त्यांचे नातेवाईक असून त्यांनी जात पडताळणी प्रमाणपत्र प्राप्त केले असल्याने, ज्या कागदपत्रांच्या आधारे त्यांनी हे जात पडताळणी प्रमाणपत्र प्राप्त केलेले आहे त्याच कागदपत्रांच्या आधारे आपण आपल्या मुलीसाठीदेखील प्रमाणपत्र प्राप्त करू शकतो. तसेच त्यांनी असाही युक्तिवाद केला की, श्री. संजय नाना शिंदे यांनी सादर केलेली कागदपत्रे ही त्यांची वैयक्तिक माहिती नसून ही माहिती त्यांनी सार्वजनिक अभिलेखातूनच प्राप्त केली आहेत. जसे की, शाळा सोडल्याचा दाखला, जमीन महसूलाचा दाखला, ७/१२ फेरफार नोंदवही ही सर्व फेरफाराची कागदपत्रे आहेत त्यामुळे त्यांना श्री. संजय नाना शिंदे यांची वैयक्तिक स्वरूपाची माहिती समजण्यात येऊ नये.

अपिलार्थी यांनी श्री. संजय नाना शिंदे हे त्यांचे नातेवाईक असल्याचे म्हटले असल्याने त्यांच्या वंशावळ संबंधीची माहिती त्यांनी पुढील सुनावणीस आयोगाकडे स्वत: उपस्थित राहून सादर करावी. जन माहिती अधिकारी यांनी श्री. संजय नाना शिंदे यांचे जात पडताळणी प्रमाणपत्र ही सदरची नस्ती आयोगाच्या अवलोकनार्थ पुढील सुनावणीस आयोगाकडे स्वत: उपस्थित राहून सादर करावी. प्रस्तुत प्रकरणी पुनश्च: सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

<u>आदेश</u>

**प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.२१.४.२०२६ रोजी दुपारी १.०० वाजता घेण्यात येईल.**

सही/-

**(शेखर चन्रे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ५ मार्च, २०२६

**अपिल क्रमांक : के.आर-३२५१/२०२२**

**अपिलार्थी, श्री.वंदना संतोष शिंदे,**

**सुनावणी दिनांक २१.४.२०२६** (In continuation of order dt.५.३.२०२६)

<u>विवेचन</u>

सदर सुनावणीस अपिलार्थी अनुपस्थित आहेत.(कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत). तथापि, विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.आकाश दिलीप शिंदे, संशोधन अधिकारी, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, कोकण विभाग, ठाणे हे उपस्थित आहेत.

या प्रकरणी अपिलार्थी यांना आजच्या सुनावणीची सूचना प्राप्त झालेली नाही. सबब, त्यांना पुन्हा सुनावणीची नोटीस काढण्यात यावी. प्रस्तुत प्रकरणी पुनश्च: सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

<u>आदेश</u>

**प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.१९.५.२०२६ रोजी दुपारी १.०० वाजता घेण्यात येईल.**

**(शेखर चन्रे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २१ एप्रिल, २०२६

संगणक -10